# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.08.2024** **वार – बुधवार**

---

**झेंडा**

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा मुख्य शासकीय कार्यक्रम उद्या गुरुवार 15 ऑगस्टला पुण्यात साजरा केला जाणार आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते विधान भवन इथं सकाळी 9 वाजून 5 मिनिटांनी ध्वजारोहण होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी साडेसात आणि शनिवार वाडा इथं सकाळी आठ वाजता ध्वजारोहण होणार आहे.

नागरिकांना मुख्य शासकीय समारंभात भाग घेता यावा यासाठी सकाळी 8 वाजून 35 मिनिटांपासून 9 वाजून 35 मिनिटे या दरम्यान ध्वजारोहणाचा अथवा इतर कोणताही शासकीय आणि निमशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये असं निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी सांगितलं आहे.

**चटई**

पुण्यासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करतानाच, पायाभूत सुविधांसाठी असलेल्या जागेत कपात सुचवणाऱ्या, सुधारित विकास नियंत्रण नियमावलीला त्वरित स्थगिती देऊन, यासंबंधी स्वतंत्र बैठक घेण्याची मागणी, शहरातल्या अनेकविध सामाजिक संघटनांनी केली आहे. राज्यसभेच्या माजी खासदार वंदना चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली यासंबंधीचं एक निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठवण्यात आलं आहे. शहराच्या सध्याच्या वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात आधीच पायाभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसताना अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देऊन शहरातील केवळ गर्दी वाढेल आणि पुण्याला आणखी बकाल स्वरूप प्राप्त होईल अशी भीती या पत्रातून व्यक्त करण्यात आली आहे.

**मिळकत**

पुणे शहरातील स्व-वापराच्या निवासी मिळकतींना करात 40 टक्के सवलत देण्यासाठी पुणे महापालिकेनं सुरु केलेल्या तपासणी मोहीमेत आतापर्यंत 3 लाख 61 हजार मिळकतींचं सर्वेक्षण पूर्ण झालं आहे. त्यानुसार 1 लाख 77 हजार मिळकतींमध्ये मालक तर 1 लाख 84 हजार

मिळकतींमध्ये भाडेकरू राहात आहेत. भाडेकरू राहात असलेल्या मिळकतींना 40 टक्के सवलत मिळणार नाही.

**महिला**
राज्य परिवहन  महामंडळाच्या महिला सन्मान योजनेचा लाभ गेला महिनाअखेरपर्यंत पुणे विभागात साडेतीन कोटी महिलांनी घेतला आहे. यंदा श्रावण महिन्यात धार्मिक स्थळी जाण्यासाठी एसटीसंगे तीर्थपर्यटन अशी सेवा सुरू केल्यानं महिला प्रवाशांसोबत ज्येष्ठ नागरिक देखील या योजनेचा लाभ घेऊ शकणार आहेत असं पुणे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी सांगितलं.

**पुरस्कार**
कला आणि समाज या दोन्हींची सांगड घालून कार्य करणाऱ्या 'आर्टिस्ट्री' या संस्थेतर्फे संस्थेचे संस्थापक दिलीप गोखले यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा 'देणे समाजाचे गौरव पुरस्कार' यंदा प्रसिध्द जलतरंग वादक मिलिंद तुळाणकर यांना देण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेच्या संचालक वीणा गोखले यांनी कळविली आहे. आपली कला जोपासत असतानाच सामाजिक भान बाळगणाऱ्या कलाकारास हा पुरस्कार देण्यात येतो. ज्येष्ठ गुरु मीराताई पणशीकर यांच्या हस्ते येत्या रविवारी 18 तारखेला पुररस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

**संप**
कलकत्ता वैद्यकीय महाविद्यालयात निवासी डॉक्टरवर बलात्कार आणि तिचा खून करण्यात आल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयातील काही निवासी डॉक्टर अद्याप संपावर आहेत. बाह्यरुग्ण विभागात रुग्णांच्या तपासणीसाठी इतर विभागातील शिक्षकांची मदत घेतली जात आहे अशी माहिती ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर एकनाथ पवार यांनी दिली.

**दहशतवादी**
पुण्यातील महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात दहशतवादी शिरल्याची अफवा पसरल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तिघांना ताब्यात घेतलं. ते मूळचे बिहारचे आहेत, दहशतवादी नाहीत अशी माहिती तपासात निष्पन्न झाली आहे.

**बिबट**
पुणे जिल्ह्यातील जुन्नरसह आंबेगाव , खेड आणि शिरूर तालुक्यात बिबट्यांचे हल्ले वाढत असल्यानं शेतकऱ्यांना एकट्यानं शेतात जाण्यास भीती वाटू लागली आहे तसंच शेतमजूरही मिळेनासे झाले आहेत. गेल्या सुमारे साडेतीन वर्षांच्या कालावधीत या परिसरात बिबट्यानी 10

हजार जनावरांचा फडशा पडला आहे. 12 नागरिकांचाही त्यात बळी गेला असून 33 जण गंभीर जखमी झाले आहेत.

**पैलवान खाशाबा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पैलवान खाशाबा जाधव यांच्या पुण्यतिथीनिमित्त कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी यांनी पैलवान खाशाबा जाधव यांच्या पुतळ्यास आणि प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने हर घर तिरंगा आणि हरित सेतू या मोहिमेच्या जनजागृतीसाठी आज सकाळी सायकल फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं. पालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते या फेरीला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. यावेळी उपस्थितांना पर्यावरण रक्षणाची शपथही देण्यात आली.

**फाळणी वेदना**

देशाच्या फाळणीमुळे विस्थापित झालेल्या आणि प्राण गमावलेल्या सर्वांप्रती श्रद्धांजली समर्पित करण्यासाठी यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स तर्फे फाळणी वेदना स्मृती दिन पाळण्यात आला.

**टेबल टेनिस**

महाराष्ट्र टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेनं नागपूर इथं सुरु असलेल्या दुसऱ्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत 17 वर्षाखालील मुलींच्या गटात नैशा रेवस्कर तर 11 वर्षाखालील मुलांच्या गटात वरदान कोलते यांनी विजेतेपद पटकावत स्पर्धेतील पुण्याचं आव्हान कायम राखलं.

## हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.